# दहशतवाद विरोधी पथक, उत्तरप्रदेश व महाराष्ट्र राज्य, गुन्हे अन्वेषण विभागाचे भरारी पथक यांची संयुक्त कामगिरी

**गॅलेक्सी ग्रुप ऑफ कंपनीजचे् दोन संस्थापक संचालक अटक**

गॅलेक्सी ग्रुप ऑफ कंपनीज्ने केलेल्या आर्थिक घोटाळया संदर्भात, महाराष्ट्र राज्यात दाखल झालेल्या २६ गुन्हयांचा तपास महाराष्ट्र राज्य, गुन्हे अन्वेषण विभाग हे करत आहेत. सदर कंपनीविरूध्द उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान या ठिकाणी देखील अनेक गुन्हे दाखल असून, यातील मुख्य आरोपी संचालक हे मागील २० वर्षापासून फरार आहेत.

मा.अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, श्री अतुलचंद्र कुलकर्णी यांनी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचा कार्यभार स्विकारल्यानंतर महत्वाच्या गुन्हयातील फरारी आरोपीबद्दल माहिती होताच, त्यांनी अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, उत्तरप्रदेश श्री. असीम अरूण यांचेशी संपर्क साधला. उत्तरप्रदेश दहशतवाद विरोधी पथक व राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे भरारी पथक यांच्या संयुक्त मोहिमेअंतर्गत गॅलक्सी कंपनी विरूध्दातील २६ गुन्हयातील मुख्य आरोपी व कंपनीचे संस्थापक

१) सतीशचंद्र भगवतीप्रसाद मिश्रा रा. संतकबीर नगर वय ६५ वर्षे

२) रामकृष्ण प्रेमचंद दुबे रा. खलीलाबाद, संतकबीर नगर, वय ५८ वर्षे

यांना चार दिवसाचे अथक परिश्रमानंतर लखनऊ येथे अटक करण्यात आले आहे.

यातील इतर आरोपी प्रमोदकुमार गंगा पांडे, अमोदकुमार पांडे, घनश्याम कालीप्रसाद पांडे, मैफतुल्लाखान अब्दुलमजीद खान, रहेफिरदौस अफताबअहमद सिद्दीकी, सतेंद्र वशिष्ठ त्रिपाठी इ. सर्व. रा. उत्तरप्रदेश यांना अटक करणेचे प्रयत्न सुरू आहेत.

**गुन्हयाची थोडक्यात पूर्वपीठिका :-**

गॅलेक्सी ग्रुप ऑफ कंपनीज् यांचे अंतर्गत ५. वेगवेगळया कंपन्यांचा समावेश असून, या सर्व कंपन्यांची रजिस्टर ऑफ कंपनीज, कानपूर कार्यालय येथे नोंद केली होती. महाराष्ट्रात या कंपनीच्या १०२ शाखा होत्या. कंपनीने अधिक व्याजाचे अमिष दाखवून लोकांकडून कोटयावधी रूपयाच्या ठेवी स्विकारल्या व कोणतीही रक्कम परत न करता १९९९ मध्ये ७,०८,४९,२६६/- रूपये चा अपहार करून कंपनी बंद करून आरोपी फरार झाले. त्यामुळे वर्धा, नागपूर, अकोला, यवतमाळ, वासीम, भंडारा, अमरावती, चंद्रपूर, बीड, लातूर, ठाणे, कोल्हापूर, रत्नागिरी येथे गुन्हे दाखल झाले होते.

Scanned by CamScanner

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे तपासात या पाचही कंपन्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे गैर बँकींग कंपन्या (NBFC) म्हणून नोंदणीकृत नसल्याचे व कंपनीला ठेवी जमा करण्याचे कोणतेही अधिकार नसल्याचे निष्पन्न झाले आहे. उपलब्ध पुराव्यांवरून, सर्व गुन्हयांत दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले असून महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांनी अनेकवेळा आरोपींचे शोध घेण्याकरीता पथक उत्तर प्रदेश येथे पाठविले होते. परंतु त्यांना यश मिळाले नव्हते. गुन्हयांत आत्तापर्यंत ४, ८६,००,०००/- रूपयाची मालमत्ता जप्त करण्यात आलेली असून अटक आरोपींकडून इतर मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

उत्तरप्रदेश दहशतवाद विरोधी पथक व महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे भरारी पथक यांचे अथक परिश्रम, नियोजन यामुळे अनेक वर्षे गुंगारा देणारे आरोपी अटक करण्यात मोठे यश मिळाले आहे. आज आरोपींना नागपूर येथे न्यायालयात हजर केले असता त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळालेली आहे.

या कामात महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उप महानिरीक्षक(आर्थिक गुन्हे) श्री. जालींदर सुपेकर, पोलीस अधिक्षक(आर्थिक गुन्हे) पल्लवी बर्गे, अपर पोलीस अधिक्षक(भरारी पथक) श्री. नरेंद्र गायकवाड, पोलीस उप अधिक्षक विलास भोसले, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक यशवंत निकम व पोलीस हवालदार कृष्णकांत देसाई व पोलीस हवालदार दत्तात्रय भापकर यांनी परिश्रम घेतले आहेत.

Scanned by CamScanner